आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१५ ऑक्टोबर २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर / महाराष्ट्रात २० नोव्हेंबरला एकाच टप्प्यात, तर झारखंडमध्ये १३ आणि २० नोव्हेंबर अशा दोन टप्प्यात मतदान, २३ नोव्हेंबरला मतमोजणी
- जम्मू काश्मीरमध्ये उद्या नव्या सरकारच्या मुख्यमंत्र्यांसह मंत्रिमंडळाचा शपथविधी
- महाराष्ट्रातल्या आणखी ६ जातींना केंद्राच्या इतर मागासवर्गीयांच्या यादीत समाविष्ट करण्याची राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाची शिफारस

**आणि**

- I S S F नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत १० मीटर एअर रायफल प्रकारात भारताच्या सोनम मसकरनं पटकावलं रौप्य पदक

<><><><><>

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी एकाच टप्प्यात येत्या २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगानं नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसार निवडणूक अधिसूचना येत्या २२ तारखेला जारी होईल, २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील, अर्जांची छाननी ३० ऑक्टोबरला होईल, तर ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील.  २० नोव्हेंबरला मतदान आणि २३ नोव्हेंबरला मतमोजणी होईल.

राज्यात विधानसभेसाठी एकूण १ लाख १८६ मतदान केंद्रं असतील. प्रत्येक मतदान केंद्रावर सुमारे ९०० ते १ हजार मतदार असतील. त्यांच्यासाठी पिण्याचं पाणी, शौचालय, दिशादर्शक फलक, रॅम्प किंवा व्हीलचेअर, मदत केंद्र, पुरेसा प्रकाश आणि मंडप व्यवस्था ठेवण्याचे निर्देश निवडणूक आयोगानं दिले आहेत.

मुंबई, ठाणे आणि पुण्यातल्या काही मतदारसंघांमध्ये ४५ टक्क्यांपेक्षा कमी मतदानाची नोंद होते. या भागात मतदानाचं प्रमाण वाढवण्यासाठी विशेष मोहीम राबवली जाणार आहे.

<><><><><>

झारखंड विधानसभेची तसंच १५ राज्यातल्या २ लोकसभा आणि ४८ विधानसभा मतदारसंघांची पोटनिवडणुकही केंद्रीय निवडणूक आयोगानं आज जाहीर केली. झारखंडमध्ये १३ नोव्हेंबर आणि २० नोव्हेंबर अशा दोन टप्प्यात ८१ मतदारसंघात मतदान होईल आणि महाराष्ट्रासोबत २३ नोव्हेंबरला मतमोजणी केली जाईल.

वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळं रिक्त झालेल्या नांदेड लोकसभा मतदारसंघात तसंच राहुल गांधी यांनी राजीनामा दिल्यामुळं रिक्त झालेल्या वायनाड लोकसभा मतदारसंघातही पोटनिवडणूक होणार आहे. नांदेड लोकसभा आणि उत्तराखंडमधल्या केदारनाथ विधानसभा मतदारसंघात महाराष्ट्राच्या विधानसभेच्या वेळापत्रकानुसार निवडणूक होईल. इतर ठिकाणी १३ नोव्हेंबरला मतदान होईल.

<><><><><>

महाराष्ट्रात नजीकच्या काळात राजकीय पक्षांच्या नेत्यांवर झालेल्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर अशाप्रकारे कुठलाही हिंसाचार होणार नाही याची खबरदारी घेण्याच्या स्पष्ट सूचना पोलिसांना दिल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले. निवडणूक काळात कुठलाही हिंसाचार, गैरप्रकार, पैशांची अवैध वाहतूक होणार नाही याकडे लक्ष ठेवण्याच्या स्पष्ट सूचना दिल्याचं ते म्हणाले.

हरयाणात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या बॅटरीच्या पातळीमधे अनियमितता झाल्याच्या २० तक्रारी काँग्रेस उमेदवारांकडून आल्या आहेत. मात्र मतदान यंत्राची तपासणी विविध पातळ्यांवर,

उमेदवारी नियुक्त केलेल्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत केली जाते, त्यामुळे त्यात कोणत्याही प्रकारचा फेरफार शक्य नाही, असं राजीव कुमार यांनी सांगितलं.

निवडणूक निकालाबाबत मतदानोत्तर अंदाज जाहीर करताना प्रसारमाध्यमही मोठ्या प्रमाणात वस्तूस्थितीची मोड-तोड केल्याची उदाहरणं त्यांनी दिली. याबाबत माध्यमांनी आत्मपरिक्षण करणं आवश्यक आहे, असं ते म्हणाले.

**<><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये उद्या होणाऱ्या मुख्यमंत्र्याच्या शपथविधीसाठी शेर ए काश्मीर इंटरनॅशनल कॉन्फरन्स सेंटर परिसरात व्यवस्था करण्यात आली आहे. ओमर अब्दुल्ला हे उद्या सकाळी साडे अकरा वाजता मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील. तसंच त्यांच्या मंत्रिमंडळातल्या इतर मंत्र्यांनाही नायब राज्यपाल मनोज सिन्हा शपथ देणार आहेत.

**<><><><>**

श्रोते हो, विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेणारा ‘रणांगण विधानसभेचे’ हा कार्यक्रम गुरुवार, १७ ऑक्टोबरपासून आकाशवाणीवर सुरू होत आहे. दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागांच्या Youtube वरुन हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल.

**<><><><>**

राष्ट्रीय मागासवर्ग आयोगानं राज्यातल्या आणखी सहा जाती केंद्राच्या इतर मागासवर्गिय सूचीत सामिल करण्याची शिफारस केंद्र सरकारला केली आहे. कुलवंत वाणी, कुणबी वाणी, कराडी, कानोडी किंवा कनाडी, नेवेवाणी, सलमानी, तसंच निषाद - मल्ला - मल्लाह किंवा नाविक या सहा जातींचा समावेश केंद्राच्या सूचीत करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारनं आयोगाकडे पाठवला होता. त्यावर गेल्यावर्षी १७ ऑक्टोबरला तसंच यावर्षी २६ जूनला मुंबईत आयोगानं जनसुनावणी घेतली त्यात सर्व कागदपत्र योग्य आढळल्यानं केंद्र सरकारला ही

शिफारस केली असल्याचं राष्ट्रीय मागासवर्ग आयोगानं प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

भारत आणि कोलंबियानं आज नवी दिल्लीत दृकश्राव्य क्षेत्रातल्या सहनिर्मिती करारावर स्वाक्षरी केली. भारताकडून माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल. मुरुगन यांनी या करारावर स्वाक्षरी केली. या करारामुळे भारत आणि कोलंबियातल्या चित्रपट निर्मात्यांच्या सहकार्याला चालना मिळेल आणि त्यातून निर्माण होणाऱ्या कलाकृतीमुळे दोन्ही देशांचे सांस्कृतिक संबंध आणखी दृढ होती.

<><><><><>

नवी दिल्ली इथं झालेल्या I S S F नेमबाजी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताच्या सोनम मसकर हिने १० मीटर एअर रायफल प्रकारात आज रौप्य पदक जिंकलं. बावीस वर्षांच्या सोनमने २५२ पूर्णांक ९ गुण मिळवले. या स्पर्धेत चीनच्या युतिंग हुआंगनं सुवर्ण, तर फ्रान्सच्या ओसियन मुलरनं कांस्य पदक पटकावलं.

<><><><><>

डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकेरी प्रकारात भारताच्या लक्ष्य सेनला चीनच्या लू गुआंग झू विरुद्ध पराभव पत्करावा लागला. तर महिला दुहेरी प्रकारात ऋतपर्णा आणि श्वेतपर्णा पांडा या जोडीचाही चांग चिंग हुई आणि यांग चिंग तुन या चिनी तैपेई जोडीने १८-२१, २२-२४ असा सरळ गेममध्ये पराभव केला.

<><><><><>

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी आज नवी दिल्लीत २७ आकांक्षित जिल्ह्यांसाठी प्रधानमंत्री गतीशक्ती राष्ट्रीय बृहत् आराखड्याच्या जिल्हा आवृत्तीचा प्रारंभ केला. प्रधानमंत्री गतीशक्ती योजनेला तीन वर्ष पूर्ण झाली असून, पायाभूत सुविधांच्या नियोजनासाठी हे अतिशय उपयुक्त साधन ठरलं आहे, असं ते

यावेळी म्हणाले. येत्या १८ महिन्यात जिल्हा बृहत् आराखड्याचा विस्तार ७५० पेक्षा जास्त जिल्ह्यांमधे केला जाईल, असं गोयल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना आज अल्जेरियाच्या अल्जीरियर्स मधल्या सीदी अब्देलाह विज्ञान आणि तंत्रज्ञान पोले विद्यापीठानं राज्यशास्त्र या विषयात मानद डॉक्टरेट बहाल केली. अल्जेरियाचे उच्च शिक्षण आणि वैज्ञानिक संशोधन मंत्र्यांनी राष्ट्रपतींना ही पदवी प्रदान केली.

हा पुरस्कार म्हणजे भारताचा सन्मान असल्याचं राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या.

**<><><><><>**

गुजरातमधल्या लोथल इथे राष्ट्रीय सागरी वारसा संकुलाची निर्मिती झाल्यामुळे संस्कृती आणि पर्यटनाला चालना मिळेल असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात प्रधानमंत्र्यांनी पर्यटन क्षेत्रातल्या व्यावसायिकांना नवीन संधी शोधण्याचं तसंच कल्पना सुचवण्याचं आवाहनही केलं.

**<><><><><>**

भारतातले उद्योग आणि गुंतवणूक वाढीला चालना देण्यात अमेरिका - भारत धोरणात्मक भागीदारी मंचाची भूमिका महत्वपूर्ण असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. या मंचाच्या सदस्यांनी अध्यक्ष जॉन टी चेंबर यांच्या नेतृत्वाखाली आज नवी दिल्लीत अर्थमंत्र्यांची भेट घेतली, त्यावेळी त्या बोलत होत्या. या भेटीत सीतारामन यांनी भारताचा वेगवान आर्थिक विकास, युवकांची महत्त्वपूर्ण भूमिका, तसंच विमा, गृहनिर्माण, नवीकरणीय उर्जा या क्षेत्रात गुंतवणूकीच्या वाढत्या संधीबाबत माहिती दिली.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आज शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी इस्लामाबादला पोहोचले. पाकिस्तानच्या अध्यक्षतेखाली ही परिषद होणार असून उद्या होणाऱ्या या परिषदेला जयशंकर उपस्थित राहतील. या परिषदेत संघटनेच्या व्यापार विषयक आणि आर्थिक धोरणांवर चर्चा होईल.

भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री ९ वर्षात पहिल्यांदाच पाकिस्तानमध्ये जात आहेत. मात्र, या परिषदेत पाकिस्तान सोबत कुठलीही द्विपक्षीय चर्चा होणार नसल्याचं जयशंकर यांनी यापूर्वीच स्पष्ट केलं आहे.

<><><><>

नानाविध संकल्पनांनी शिक्षण क्षेत्राला नवे आयाम प्राप्त करून देणारे ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ अशोक प्रधान यांचं आज कल्याणमध्ये वार्धक्यानं निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते.

मुंबईतल्या रुपारेल महाविद्यालयात प्राध्यापक, आणि नंतर प्राचार्य म्हणून त्यांनी काम केलं. त्यानंतर मुंबई विद्यापीठाचं उप कुलगुरूपद आणि यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात कुलगुरूपदही त्यांनी भूषवलं होतं.

<><><><>

येत्या तीन चार तासात मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वादळी वारे, आणि विजांच्या कडकडाटासह मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.